# University of Mumbai

परीक्षा विभाग/
अभि. निकाल कक्ष
महात्मा फुले भवन,
विद्यानगरी, कलिना,
सांताक्रुझ (पूर्व),
मुंबई — ४०००९८


क्र.परीक्षा/अभि.निकाल कक्ष/१६८८/२०१६

## परिपत्रक :—

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्राचार्य/संचालक यांना सुचित करण्यात येते की, नोव्हेंबर/डिसेंबर, २०१६ (द्वितीय सत्र २०१६) मध्ये घेण्यात येणाऱ्या अभियांत्रिकी पदवी परीक्षेच्या खालील नमुद केलेल्या शिक्षणक्रमाच्या परीक्षा प्रवेश अर्ज [redacted]mu.ac.in या वेब लिंक वरून Online घेण्यात येणार आहे.

1) F.E. (Sem.I) (Old/Rev./CBSGS/CBCGS)
2) F.E. (Sem.II) (Old/Rev./CBSGS)
3) B.E.(Sem.VII)(Old, Rev.& CBSGS)
4) B.E. (Sem.VIII)(Old, Rev., CBSGS)

वरील अभ्यासक्रमांचे परीक्षा प्रवेश अर्ज उपरोक्त वेब लिंक वरून Online स्विकारण्याच्या तारखांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

| अ. क्र. | परीक्षा शुल्क | Online अर्ज भरण्याची व Inward करण्याच्या तारखा | Form Submission Report व विहित शुल्क विद्यापीठात जमा करण्याच्या तारखा |
|---|---|---|---|
| १. | नियमित शुल्क | २२/९/२०१६ — १८/१०/२०१६ | २१/१०/२०१६ पर्यंत |
| २. | विलंब शुल्क रू. १००/— सहित | १९/१०/२०१६ — २५/१०/२०१६ | २८/१०/२०१६ पर्यंत |
| ३. | अतिविलंब शुल्क रू. ५००/— सहित | २६/१०/२०१६ — २९/१०/२०१६ | ३/११/२०१६ पर्यंत |

वर नमुद केलेल्या तारखांचा तपशीलाप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील वरील नमुद केलेल्या परीक्षांसाठी प्रविष्ठ होण्यास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा प्रवेश अर्ज उपरोक्त वेब लिंक वर Online भरून ते आपल्या महाविद्यालयाच्या Login मध्ये Inward करून घ्यावेत व सदर Inward झालेल्या परीक्षा प्रवेश अर्जाची व Form Submission Report ची प्रिंटस् काढून,परीक्षा अर्जासोबत विद्यार्थ्यांचे मागिल सत्राचे /परीक्षांचे गुणपत्रिकांच्या छायांकित (गुणपत्रिका संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यानी साक्षांकित केलेल्या असणे आवश्यक आहे.) प्रती जोडून हे अर्ज, Form Submission Report ची प्रिंट व विहीत परीक्षा शुल्क विद्यापीठाच्या परीक्षा विभागात हस्तेपोच जमा करावी. <u>पोस्टाने अथवा कुरिअरने स्विकारले जाणार नाहीत.</u>

परीक्षा अर्ज विद्यापीठात जमा करताना हया अर्जाचे सत्र निहाय, पॅटर्न निहाय (Old /CBSGS), शाखा निहाय असे गठ्ठे बांधूनच विद्यापीठात जमा करावे. जेणेकरून हया अर्जाची छाणणी करणे सुलभ होईल.

परीक्षा प्रवेश अर्ज स्विकारण्याच्या विलंब शुल्काच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी ६ वाजता (२९/१०/२०१६ रोजी सायं.६ वा.)Inward Link आपोआप बंद होणार असल्यामुळे परीक्षा अर्ज Inward करता येणार नाहीत व परीक्षा अर्ज स्विकारण्याची मुदत <u>कोणत्याही परिस्थीतीत वाढवून दिली जाणार नाही या बाबींची नोंद घेण्यात यावी.</u>

परीक्षा प्रवेश अर्ज Inward झाल्यानंतर यामध्ये कोणतीही दुरूस्ती करता येणार नाही, यामुळे परीक्षा अर्ज Inward करण्यापूर्वी महाविद्यालयांनी संबंधीत विद्यार्थ्यांचे नांव (इंग्रजी व मराठी या दोन्ही लिपीत), विषय व इतर सर्व माहिती अचुक व बरोबर याची खात्री करून घ्यावी.

जे विद्यार्थी प्रथम सत्र २०१६ च्या परीक्षेस प्रविष्ठ होऊन अनुत्तीर्ण असतील व त्यांनी पुर्नमुल्यांकनासाठी अर्ज सादर केला असेल अश्या विद्यार्थ्यांचे द्वितीय सत्र २०१६ मध्ये होणाऱ्या या परीक्षांसाठीचे परीक्षा प्रवेश अर्ज ( Provisional Basis) त्यांच्या पुर्नमुल्यांकनाच्या निकालाची प्रतिक्षा न करता उपरोक्त विहित कालावधीत सादर करावेत.

**B.E.(Sem.VII) (O.T.R.) व B.E. (Sem.VIII)(O.T.R.) या परीक्षांसाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा आवेदनपत्र पारंपारीक पद्धतीने (Hard Copy स्वरूपात) वरील नमुद केलेल्या तारखांच्या वेळापत्रकाप्रमाणे भरून विद्यापीठाकडे पाठवावेत.**

तसेच पुढे आपणांस असेही कळविण्यात येते की, B.E. (Sem.VII& VIII)या सत्रासाठी प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा प्रवेश अर्ज भरताना विद्यापीठ Ordinance - 3729 व 3731 या मधील नमुद असलेल्या तरतुदीचे तंतोतंत पालन करावे. या Ordinance मधील तरतुदीचा उल्लंघन झाल्यास व यामुळे भविष्यात काही कायदेशीर/न्यायालयीन बाबी उद्भवल्यास यांची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची असेल याची नोंद घ्यावी.

(Web Link :- mu.ac.in ⟶ exams & results ⟶ examination ⟶ follow the instructions given on the page)

स्थळ : मुंबई.
दि. १९ सप्टेंबर, २०१६.

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व अभियांत्रिकीच्या सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक

अ. प्रत माहितीसाठी व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित

१. प्रभारी संचालक, केंद्रीय संगणक सुविधा विभाग, परीक्षा विभाग
२. सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग व वित्त व लेखा विभाग
३. सर्व सहायक कुलसचिव, परीक्षा विभाग

ब. प्रत माहितीसाठी अग्रेषित

१. संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग, मुंबई विद्यापीठ.
२. मा. कुलगुरू यांचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई – ३२.
३. मा. प्र. कुलगुरू, मा. संचालक बीसीयुडी, कुलसचिव व परीक्षा नियंत्रक यांचे स्विय सहायक

(दीपक वसावे)
स्था. परीक्षा नियंत्रक